# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक ०३/०२/२०२५ (सोमवार) दुपार**

---

## तीन नविन कायदयाचा प्रसार व प्रसिद्धी साठी घेण्यात आली कार्यशाळा

पोलीस स्टेशन कळमेश्वर जिल्हा नागपूर ग्रा. यांचे तर्फे आज दिनांक०३/०२/२०२५ रोजी १३.३० वा ते १५.३० वा. दरम्यान नगर परीषद श्शाळा कळमेश्वर येथिल हॉलमध्ये भारत सरकारने सन २०२३ मध्ये तयार केलेले भारतिय न्याय संहीता, भारतिय नागरीक सूरक्षा संहीता, भारतिय साक्ष अधिनियम हे नविन तिन कायदे तयार केले असून ते माहे जूलै २०२४ रोजीपासून संपूर्ण भारतात लागू करण्यात आले. नमूद कायदया बाबत सामान्य नागरीका मध्ये जागृती व्हावी व नमूद कायदयाची प्रभाविपणे अंमलबजावणी व्हावी याकरिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. सदर कार्यशाळा ही मा. श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस अधिक्षक ना.ग्रा., श्री. रमेश धूमाळ अपर पोलीस अधिक्षक ना.ग्रा., यांचे मार्गदर्शनात ,श्री अनिल म्हस्के. सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागिय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग सावनेर यांचे अध्यक्षतेखाली आयोजित केलेली होती. सदर कार्यशाळेत कार्यक्रमाचे उदघाटक म्हणून मा श्री. रविंद्र राठोर, न्यायाधिश प्रथम वर्ग न्यायालय कळमेश्वर, मा. श्री. एस. बी. मांडवे, न्यायाधिश प्रथम वर्ग न्यायालय कळमेश्वर हे हजर होते. प्रमूख अतिथी श्रीमती अनूजा गराटे, गटविकास अधिकारी, कळमेश्वर, श्री. पांडूरंगजी पाखले, सहायक वनसंरक्षक, श्री. प्रविण शिरपूरकर , विभागिय वनअधिकारी, श्री. प्रशांत कोयताडे , प्रशासकीय अधिकारी, न.प. कळमेश्वर, श्रीमती रजिया पारेख, वैदयकीय अधिकारी कळमेश्वर असे हजर होते. प्रमूख वक्ते श्रीमती पल्लवी सोनवाने ,श्री. आकाश काळे सरकारी अभियोक्ता प्रथमवर्ग न्यायालय कळमेश्वर, ज्येष्ठ नागरीक संघटना कळमेश्वर अध्यक्ष श्री. कृष्णाजी बगडे हे हजर होते. उपस्थित मान्यवरांनी नविन कायदे बाबत मार्गदर्शन केले. सदर कार्यशाळेस पोलीस पाटील, ज्येष्ठ्नागरीक, सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, तलाठी, तंटामूक्ती अध्यक्ष, आशा वर्कर, अंगनवाडी सेविका, नगर परीषद श्शाळेतील शिक्षक, विध्यार्थी व नागरीक मोठया संख्येने सहभागी झाले होते. सदर कार्यशाळेचे आयोजन पोलीस स्टेशन कळमेश्वर येथिल पोलीस निरीक्षक श्री. मनोज काळबांडे ,सहायक पोलीस निरीक्षक श्री. देवेंद्र वंजारी., पो.उप.नि. मनोज टिपले आणि पोलीस स्टेशन कळमेश्वरचे अंमलदार हजर होते.




नविन कायदे जागृकता कार्यशाळा



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर